नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ८८ Issue - 88 | वार गुरूवार दि. १४ ऑगस्ट २०२५३ Blow- Thursday Date 14 August 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## मतचोरीचा पर्दाफाश; मृत लोकांसमवेत चहा पिण्याचा अनुभव : राहुल गांधी

### मतदान चोरीच्या मुद्द्यांवरून केंद्र सरकार, निवडणूक आयोगांवर गंभीर आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: राहुल गांधी नी ७ ऑगस्टला पत्रकार परिषद घेत मतचोरीचे आरोप लावले होते. त्यानंतर देशभरात या मुद्द्यावर वातावरण तापलं आहे. तसेच सध्या बिहारमधील निवडणुकीच्या तोंडावर मतदारांच्या याद्यांच्या पुनरावलोकनावरून राजकीय वातावरण तापलं आहे. राहुल गांधी यांनी बुधवारी अशा अनेक लोकांशी भेट घेतली, ज्यांना निवडणूक आयोगाच्या नवीन मतदार यादीत मृत घोषित करण्यात आले आहे. राहुल गांधी यांनी त्यांच्यासोबत चहा घेतला आणि निवडणूक आयोगावर टीका करत म्हटले की, जीवनात मृत लोकांसोबत चहा पिण्याचा अनुभव आला नव्हता आणि निवडणूक आयोगावर उपरोधिक टीका केली. बिहारमधील राघोपूर



विधानसभा क्षेत्रात निवडणूक आयोगाच्या मतदार यादीत मृत घोषित केलेल्या ७ मतदारांसोबत काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी चहा घेतला. या भेटीचा व्हिडिओ त्यांनी त्यांच्या सोशल मीडिया हँडल एक्सवर शेअर केला. त्यासोबत त्यांनी लिहिले, जीवनात अनेक मनोरंजक अनुभव आले, पण 'मृत लोकां'सोबत चहा पिण्याचा अनुभव कधीच आला नव्हता. या अनोख्या अनुभवासाठी, निवडणूक आयोगाचे आभार! या मतदारांमध्ये रामिकबाल राय, हरेंद्र राय, लालमुनी देवी, वचिया देवी, लालवती देवी, पूनम कुमारी आणि मुन्ना कुमार यांचा समावेश आहे. हे सर्व तेजस्वी यादव यांच्या मतदारसंघातील मतदार आहेत. आरोप आहे की, डखठ प्रक्रियेदरम्यान आवश्यक कागदपत्रे सादर करूनही त्यांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली. राहुल गांधी आणि काँग्रेसचा आरोप आहे की, हे केवळ निष्काळजीपणा नसून मतदारांना मतदानापासून वंचित ठेवण्याचे राजकीय षडयंत्र आहे. काँग्रेसच्या म्हणण्यानुसार, निवडणूक आयोगाने मृत, स्थलांतरित मतदारांची यादी सार्वजनिकपणे जारी केली नाही. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केवळ २-३ बूथवरून अनौपचारिकपणे ही माहिती मिळवली. या सात लोकांचे प्रकरण हे केवळ एक उदाहरण आहे, संपूर्ण क्षेत्रात असे असंख्य मतदार आहेत, ज्यांना मृत घोषित करून यादीतून बाहेर काढले आहे, असा दावा करण्यात येत आहे.

## ट्रम्प टॅरिफ बॉम्बवर चीनच्या मैत्रीचा उतारा; चीनचे परराष्ट्रमंत्री अन् अजित डोवाल भेट घेणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर अतिरिक्त २५ टक्के टॅरिफ लावण्याची घोषणा केल्यानंतर आंतरराष्ट्रीय कूटनीतीत नवा पेच निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर चीनने भारताशी संबंध सुधारण्यासाठी पावले उचलली असून, चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी पुढील आठवड्यात भारत दौऱ्यावर येणार आहेत. या भेटीदरम्यान ते राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (छड) अजित डोवाल यांच्याशी चर्चा करणार आहेत.

चीन आणि भारतासारख्या दोन मोठ्या शक्तींचे एकत्र येणे हे अमेरिकेसाठी धोरणात्मक चिंतेचे कारण मानले जात आहे. ट्रम्प प्रशासन भारतावर रशियाकडून कच्चे तेल खरेदी थांबवण्याचा दबाव टाकत आहे. मात्र, भारताने स्पष्ट केले आहे की आपले ऊर्जाहित सांभाळूनच धोरण आखले जाईल. दरम्यान, अमेरिका पाकिस्तानसोबत जवळीक वाढवत असल्याच्या हालचाली दिसत आहेत.



वांग यी यांचा दौरा सुरू होण्याआधीच परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर २१ ऑगस्ट रोजी रशिया भेटीवर जाणार आहेत. गेल्या आठवड्यात अजित डोभाल यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी भेट घेऊन सुरक्षा, संरक्षण सहकार्य आणि आगामी नेतृत्वस्तरीय बैठकींची तयारी यावर चर्चा केली होती. डोभाल यांनी संकेत दिला आहे की पुतिन लवकरच भारत दौऱ्यावर येतील.

भारत-चीन संबंध २०२० मधील गलवान खोऱ्यातील हिंसक संघर्षानंतर ताणलेले होते. तथापि, आता दोन्ही देश पुन्हा संवादाच्या मार्गावर आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी ३१ ऑगस्ट ते १ सप्टेंबर दरम्यान चीनच्या तियानजिन शहरात होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेच्या (डउज) शिखर परिषदेत सहभागी होतील. या परिषदेच्या व्यासपीठावर रशिया आणि चीन दोन्ही देश उपस्थित राहतील.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ घोषणेमुळे भारताच्या निर्यात बाजारावर ताण वाढू शकतो. विशेषतः स्टील, ॲल्युमिनियम आणि टेक्सटाईलसारख्या क्षेत्रांवर याचा थेट परिणाम होण्याची शक्यता आहे. अशा वेळी चीनसारख्या मोठ्या बाजारपेठेशी संबंध सुधारणे भारतासाठी आर्थिक दृष्ट्या फायदेशीर ठरू शकते.

ट्रम्प यांचा तऱ्हेवाईकपणा सांभाळणं आणि दुसरीकडं आपल्या जुन्या मित्रांसोबतचे संबंध वाढवणं हे भारतासमोरचं आव्हान असणार आहे. एकीकडं स्वदेशीचा नारा देत दुसरीकडं नवे व्यापारी संबंध प्रस्थापित करण्याची दुहेरी पावलं सध्या भारताकडून उचलली जात असल्याचं दिसून येतंय.

## सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी 'ऑपरेशन सिंदूर' आणि 'स्वदेशी' विषयी जनजागृती करावी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी यावर्षीच्या गणेशोत्सवामध्ये भारताने जगाला ऑपरेशन सिंदूरद्वारे दाखविलेली शक्ती आणि स्वदेशी वस्तूंच्या वापराविषयी जनजागृती करावी. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी प्रशासनासोबत समन्वय ठेवून हा गणेशोत्सव शांतता व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करीत ' ऑपरेशन सिंदूर' वर आधारित देखावे हे जवानांसाठी समर्पित असण्याची अपेक्षाही व्यक्त केली.



### शांतता व उत्साहपूर्ण वातावरणात गणेशोत्सव साजरा करावा; गणेशोत्सव निमित्त कायदा व सुव्यवस्था बैठक

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गणेशोत्सवा दरम्यान गणेश भक्तांना कुठल्याही प्रकारे अडचणी येणार नाहीत, त्यापद्धतीने कार्यवाही करण्याच्या सूचनाही प्रशासनाला दिल्या. सार्वजनिक गणेशोत्सव निमित्त कायदा व सुव्यवस्था बैठकीचे आयोजन सह्याद्री अतिथी गृह येथे करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री आढावा घेताना बोलत होते. बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाप्रमाणे मूर्तीकारांनाही सलग पाच वर्ष परवानगी देण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री म्हणाले, मूर्तीकारांनी या परवान्यांचे दरवर्षी नूतनीकरण करावे. परवानगीसाठी महापालिके मार्फत सुरू करण्यात आलेल्या संगणकीय प्रणालीवर आधारित एक खिडकी योजनेचा लाभ घेण्यात यावा. गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यासाठी कृत्रिम तलावांची संख्या आणि उंच मूर्तींचे खोल समुद्रात विसर्जनासाठी बोटींची संख्याही समुद्रकिनारी वाढविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

मुख्यमंत्री म्हणाले, गणेशोत्सव-ाला राज्य शासनाने राज्य महोत्सवाचा दर्जा दिला आहे. त्यामुळे राज्य शासनातर्फे हा महोत्सव साजरा करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर विस्तृत नियोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सव मंडळांना मागील वर्षी दिलेल्या सर्व सवलती याही वर्षी कायम ठेवण्यात येतील. हा उत्सव साजरा करताना कायद्याचे योग्य पालन करावे. ईद ए मिलाद सणही गणेशोत्सवा दरम्यान येत असल्याने समन्वयाने धार्मिक सौहार्दता ठेवत कुठेही कायदा सुव्यवस्था बिघडणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. गणेशोत्सवादरम्यान ध्वनिक्षेपकांना दिलेल्या परवानगीचे दिवस वाढविण्यासाठी न्यायालयाच्या अधीन राहून सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या कार्यालयांसाठी मालमत्ता कराची आकारणी करताना या कार्यालयांचा व्यावसायिक कारणासाठी उपयोग होत नसल्याबाबत मंडळांनी प्रशासनाला लेखी दिल्यास, अशा मंडळांच्या कार्यालयांवर मालमत्ता कराची आकारणी करण्यात येणार नाही, असा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

बैठकीस गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बाल सिंग चहल, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, प्रधान सचिव (विशेष) अनुपकुमार सिंग, बृहन्मुंबई मनपा आयुक्त भूषण गगराणी, सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीचे अध्यक्ष गणेश दहिबावकर आदींसह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, गणेशोत्सव समित्या आणि मूर्तिकार संघटनांचे अध्यक्ष उपस्थित होते, तर दूरदृष्टी प्रणाली द्वारे मनपा आयुक्त, पोलीस आयुक्त, जिल्हा पोलीस अधीक्षक यांची उपस्थिती होती. बैठकीत महापालिका अतिरिक्त आयुक्त अमित सैनी यांनी सादरीकरण केले.

## 'लंपी'च्या पार्श्वभूमीवर पशुधनाचे लसीकरण करुन घेण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : महाराष्ट्रातील एकूण गोवंशीय पशुधनाच्या तुलनेत लंपीचा (चर्मरोग) प्रादूर्भाव अत्यल्प आहे. प्रादुर्भावग्रस्त भागात उपचार, कीटक नियंत्रण व जनजागृती मोहीम सुरू असून पशुपालकांनी घाबरून न जाता जनावरांचे लसीकरण करून घ्यावे आणि पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन. यांनी केले आहे.

लंपीमुळे राज्यातील ९ हजार ८२० पशुधन बाधित असून ६ हजार ६१८ जनावरे उपचारानंतर बरी झाली आहेत. तर आतापर्यंत ३३९ जनावरांचा मृत्यू झाला आहे. शासनामार्फत तात्काळ व प्रभावी नियंत्रण उपाययोजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. राज्यात ९३ टक्क्यांपेक्षा जास्त गोवंशीय पशुधनाचे लसीकरण पूर्ण झाले आहे. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात गोट पॉक्सची विजातीय उत्तरकाशी स्ट्रेन लस दिली जात असून त्याचा परिणाम होऊन रोग प्रादूर्भाव कमी झाले आहेत. लंपी रोग प्रतीबंधक सजातीय लस वापरली गेली तर रोग नियंत्रणाकरीता अधिक परिणामकारक होईल. त्यामुळे या पुढील काळात लंपीवर नियंत्रण आणण्यासाठी लंपी प्रतिबंधात्मक लस निर्मितीचे तंत्रज्ञान भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली यांच्या ॲग्रीइन्नोवेट इंडिया या कंपनीकडून उपलब्ध करून घेतले असून त्यामुळे पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे या पशुसंवर्धन विभागाच्या राज्यस्तरीय संस्थेमध्ये व्यावसायिक तत्त्वावर लसनिर्मिती लवकरच करण्यात येणार आहे. त्यामुळे भविष्यात राज्य लंपी लस उत्पादनामध्ये स्वयंपूर्ण होवून राज्यातील १०० टक्के गोवर्गीय पशुधनास दरवर्षी प्रतिबंधात्मक लसीकरण करणे शक्य होणार आहे. पशुसंवर्धन विभागाने लंपी प्रादुर्भावाचा साथरोग विषयक अभ्यास करुन रोग प्रतिबंधक लसीकरणाचा समावेश मान्सून पूर्व लसीकरण कार्यक्रमामध्ये केला आहे. या करिता ११९ लक्ष लस मात्रा व अनुषंगिक साहित्याचा पुरवठा पावसाळा सुरू होण्यापूर्वी करण्यात आला आहे. लंपीबाबत पशुपालक तसेच पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे, अशी माहिती पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी दिली आहे.

**सन २०२३-२४ चे उत्कृष्ट ग्रंथालय, उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक पुरस्काराचे वितरण**

**उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांचे आश्वासन**

## ग्रंथालयांच्या अनुदानात ४० टक्के वाढ करण्यासाठी शासन सकारात्मक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आजच्या डिजिटल युगात ग्रंथालय चळवळ टिकेल का असा प्रश्न पडतो पण आजची तरुण मंडळी अधिक ग्रंथालयाकडे वळली आहे. विविध वाचन उपक्रमात सक्रिय सहभाग घेत आहेत, त्यासाठी ग्रंथालयांना पुस्तकांनी समृद्ध करावे, असे आवाहन करून ग्रंथालयांच्या अनुदानात ४० टक्के वाढ करण्यासाठी शासन सकारात्मक आहे, असे आश्वासन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी दिले.

एसएनडीटी महिला विद्यापीठ, पाटकर सभागृह येथे सन २०२३-२४ चे उत्कृष्ट ग्रंथालय आणि उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक पुरस्कार उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. यावेळी अपर मुख्य सचिव बी वेणूगोपाल रेड्डी, राज्य ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, उपसचिव अमोल मुत्याल, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार आदी उपस्थित होते.

मंत्री पाटील पुढे म्हणाले, यंदा ग्रंथ प्रदर्शन माध्यमातून जवळपास ४० कोटी पुस्तकांची विक्री झाली. १० लाख वाचकांनी या ग्रंथ प्रदर्शनास भेट दिली. यामध्ये ४ लाख शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी झाले होते. ग्रंथालय चळवळ टिकावी आणि पुढे वाढत जावी यासाठी 'एक तास शांतता पुणे वाचत आहे', '१५ दिवसात पुस्तक वाचून परीक्षण लिहिणे' यासारखे अनेक उपक्रम राबवण्यात आले. यामध्ये ३ लाख ७५ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या विद्यार्थ्यांनी पुस्तक परीक्षण सुद्धा लिहिले.



वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी प्रदर्शने, पुस्तक परीक्षण, कविता वाचन यासारखे कार्यक्रम राबविण्यात यावीत. ग्रंथालय चळवळीच्या विकासासाठी मान्यता रद्द झालेल्या २ हजार नवीन ग्रंथालयांना मान्यता देण्यात येणार आहे. तसेच ज्या सार्वजनिक वाचनालयाला ५०, ७५ व १०० वर्षे पूर्ण झाली आहेत त्यांना विशेष अनुदान देण्यात येणार असल्याची घोषणा मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली.

### सामाजिक उत्तरदायित्व निधीतून ग्रंथालयाचे बळकटीकरण करावे : विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

राज्यातील जनतेचे सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक जीवन समृद्ध करण्यासाठी व वाचन संस्कृती वृध्दींगत होण्यासाठी वाचन चळवळ अधिक समृद्ध केली पाहिजे. ज्या ग्रंथालयांच्या इमारती जुन्या झाल्या आहेत त्यांच्या नवीन बांधकामांसाठी अनुदानात शासनाने वाढ करावी तसेच ग्रंथालयांमध्ये तंत्रज्ञानावर आधारित पुस्तकांचा समावेश असावा. आणि पालकमंत्र्यांच्या निधीतील एक टक्के निधी ग्रंथालय चळवळीसाठी द्यावा, असे विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले.

## संपादकीय....

## धोरणात्मक रणनीती

चीन आणि भारतासारख्या दोन मोठ्या शक्तींचे एकत्र येणे हे अमेरिकेसाठी धोरणात्मक चिंतेचे कारण मानले जात आहे. ट्रम्प प्रशासन भारतावर रशियाकडून कच्चे तेल खरेदी थांबवण्याचा दबाव टाकत आहे. मात्र, भारताने स्पष्ट केले आहे की आपले ऊर्जा-हित सांभाळूनच धोरण आखले जाईल. दरम्यान, अमेरिका पाकिस्तानसोबत जवळीक वाढवत असल्याच्या हालचाली दिसत आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर अतिरिक्त २५ टक्के टॅरिफ लावण्याची घोषणा केल्यानंतर आंतरराष्ट्रीय कूटनीतीत नवा पेच निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर चीनने भारताशी संबंध सुधारण्यासाठी पावले उचलली असून, चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी पुढील आठवड्यात भारत दौऱ्यावर येणार आहेत. या भेटीदरम्यान ते राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (छड) अजित डोवाल यांच्याशी चर्चा करणार आहेत. वांग यी यांचा दौरा सुरू होण्याआधीच परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर २१ ऑगस्ट रोजी रशिया भेटीवर जाणार आहेत. गेल्या आठवड्यात अजित डोभाल यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी भेट घेऊन सुरक्षा, संरक्षण सहकार्य आणि आगामी नेतृत्वस्तरीय बैठकींची तयारी यावर चर्चा केली होती. डोभाल यांनी संकेत दिला आहे की पुतिन लवकरच भारत दौऱ्यावर येतील. भारत-चीन संबंध २०२० मधील गलवान खोऱ्यातील हिंसक संघर्षानंतर ताणलेले होते. तथापि, आता दोन्ही देश पुन्हा संवादाच्या मार्गावर आहेत.

## सैनिक टाकळीचा सुपुत्र संजय जयसिंग पाटील यांना महाराष्ट्र शासनाचा ताम्रपट पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सैनिक टाकळी/संजय चव्हाण : सैनिक टाकळी ता.शिरोळ जि.कोल्हापूर येथील हवालदार इन्स्ट्रक्टर संजय जयसिंग पाटील (सैनिक टाकळी) हे भारतीय सैन्यामध्ये १४ जुलै २०१५ रोजी रुजू झाले.वर्ष २०१५ १६ दरम्यान ते ११६ इन्फंट्री बटालियन पॅरॅशूट रेजिमेंट अंतर्गत जम्मू-काश्मीरच्या रजौरी सेक्टर मध्ये कार्यरत होते. दिनांक १६ मार्च रोजी ऑपरेशन रक्षक अंतर्गत ते कार्यरत असते वेळी एका दुर्घटने दरम्यान त्यांच्या उजव्या पायाला गोळी लागली. म्हणून त्यांचा मंत्री मा.ना श्री. प्रकाश सुशिला आनंदराव आबिटकर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण ,महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री कोल्हापूर जिल्हा यांच्या शुभहस्ते हस्ते १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त ताम्रपट देऊन यथोचित सत्कार होणार आहे.

## माळकरंजा जि. प. शाळेत जंतनाशक गोळ्यांचे वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि /सुधाकर रणदिवे : तालुक्यातील जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा माळकरंजा येथे जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात आले. समुदाय आरोग्य अधिकारी श्रीमती शितल दळवी तसेच आरोग्य सेवक श्री संदीप पवार आणि आरोग्य सेविका श्रीमती आस्मा सय्यद यांनी शाळेत येऊन सर्व विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्या खाऊ घातल्या. तसेच जंतनाशक गोळ्या खाण्यामुळे होणारे फायदे तसेच शरीरातील विविध आजार याबद्दल सविस्तर माहिती दिली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक तथा राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे राज्य सरचिटणीस श्री संतोष भोजने, उपक्रमशील शिक्षक श्री हनुमंत घाडगे, श्रीमती भारती सूर्यवंशी, श्री मकरंद नाडे व युवा प्रशिक्षणार्थी कुमारी मंजुश्री नारायण कराड हे उपस्थित होते.

76 FPA India
Family Planning Association of India

# अवयवदान : महान दान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मानवजातीच्या इतिहासात दानाला नेहमीच सर्वोच्च स्थान मिळाले आहे. पैसा, अन्न, वस्त्र, शिक्षण यांसारख्या अनेक गोष्टी आपण देतो, पण यांपैकी सर्वांत श्रेष्ठ, सर्वांत उदात्त आणि जीवनदायी दान म्हणजे अवयवदान. कारण हे दान फक्त जीवनाला आधारच देत नाही, तर मृत्यूच्या पलीकडे जाऊन दुसऱ्याला नवजीवन देते.

एक डॉक्टर म्हणून, रुग्णांच्या डोळ्यातील वेदना, त्यांच्या कुटुंबियांच्या अपेक्षा आणि अवयव मिळाल्यावर त्यांच्या चेहऱ्यावरचे समाधान मी प्रत्यक्ष अनुभवले आहे. त्यामुळेच, मला वाटते की प्रत्येकाने आयुष्यात एकदा तरी 'अवयवदानाची' शपथ घ्यावी.

**अवयवदान म्हणजे काय?**

अवयवदान म्हणजे, जिवंत असताना किंवा मृत्यूनंतर आपल्या शरीरातील अवयव (जसे हृदय, मूत्रपिंड, यकृत, फुफ्फुस, डोळे, त्वचा इ.) इतर गरजू रुग्णांना प्रत्यारोपणासाठी दान करणे.

**अवयवदानाचे दोन प्रमुख प्रकार आहेत:**

१. जिवंत दान (Living Donation) - जिवंत व्यक्ती स्वतःच्या एका किडनीसारख्या अवयवाचा किंवा लिव्हरचा काही भाग इतर व्यक्तीला देऊ शकते.

२. मृत्यूनंतरचे दान (Deceased / Cadaver Donation) - व्यक्तीचा मेंदू मृत्यू (ईरळप ऊशरींह) किंवा नैसर्गिक मृत्यू झाल्यानंतर, त्याचे अवयव प्रत्यारोपणासाठी घेतले जातात.

**अवयवदानाची गरज**

**भारतासह जगभरात हजारो रुग्ण अवयवाच्या प्रतीक्षेत असतात.**

■ किडनी निकामी झालेल्या रुग्णांना आठवड्यातून दोन ते तीन वेळा डायालिसिस घ्यावा लागतो, जो खर्चिक आणि त्रासदायक असतो.

■ यकृत निकामी झाल्यास काही दिवसांतच मृत्यू होऊ शकतो.

■ हृदय बंद पडलेल्या रुग्णाला प्रत्यारोपणाशिवाय दुसरा पर्याय नसतो.

**जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO)** आकडेवारीनुसार, जगभरात प्रत्येक वर्षी लाखो रुग्णांना अवयव प्रत्यारोपणाची गरज असते, पण प्रत्यक्षात केवळ १०-१५% रुग्णांनाच अवयव मिळतात. भारतात दरवर्षी सुमारे ५ लाख लोक अवयव न मिळाल्यामुळे मृत्यू पावतात.

**भारतातील परिस्थिती**

भारतामध्ये अवयवदानाबाबत जागरूकता वाढत असली तरी अजूनही ती पुरेशी नाही.

■ ऑर्गन डोनेशन रेट (प्रति दहा लाख लोकसंख्येतील अवयवदान) - भारतात फक्त ०.५, तर स्पेनमध्ये ३५-४०.

■ अवयवदानाला लागणाऱ्या वैद्यकीय सुविधा, ब्रेन डेड ओळखणारे प्रशिक्षित डॉक्टर, आणि अवयव साठवण्यासाठी आवश्यक व्यवस्था अजूनही मर्यादित आहेत.

■ अनेकदा धार्मिक गैरसमज, कायदेशीर अडचणी आणि कुटुंबाची अनिच्छा ही मोठी अडथळे ठरतात.

**कायदेशीर बाजू**


भारतात Transplantation of Human Organs and Tissues ct, 1994 (THOT) लागू आहे.

**या कायद्यानुसार:**

■ ब्रेन डेड रुग्णाचे अवयव कुटुंबाच्या संमतीने दान करता येतात.

■ जिवंत दान केवळ जवळच्या नातेवाईकांमध्येच (पालक, भाऊ, बहीण, पत्नी/पती, मुले) होऊ शकते.

■ नातेवाईक नसल्यास, Authorisation Committee ची परवानगी घ्यावी लागते.




■ अवयव विक्री किंवा पैशासाठी देणे हा गुन्हा आहे.

**ब्रेन डेड म्हणजे काय?**

ब्रेन डेड म्हणजे मेंदूचे सर्व कार्य कायमचे थांबणे, जरी हृदय काही वेळ धडकत असले तरी. अशा स्थितीत रुग्णाला वाचवणे शक्य नसते, पण त्याचे हृदय, किडनी, लिव्हर, डोळे इत्यादी अवयव कार्यरत असतात आणि प्रत्यारोपणासाठी वापरता येतात.

ब्रेन डेड घोषित करण्यासाठी प्रशिक्षित डॉक्टरांची एक समिती विशिष्ट वैद्यकीय तपासण्या करते आणि दोन वेळा पुष्टी करते.

**कोणते अवयव आणि ऊती दान करता येतात?**

१. अवयव (जीसरपी)

■ हृदय

■ मूत्रपिंड (दोन्ही)

■ यकृत

■ फुफ्फुस

■ स्वादुपिंड (Pancreas)

■ आतडी

२. ऊती (Tissues)

■ डोळे (कॉर्निया)

■ त्वचा

■ हाडे

■ हृदयाचे झडपे

**अवयवदानाची प्रक्रिया**

१. नोंदणी - अवयवदानासाठी अधिकृत संस्थांमध्ये नोंदणी करावी (उदा. NOTTO, ZTCC).

२. ओळखपत्र - 'डोनर कार्ड' सोबत ठेवावे.

३. कुटुंबाची माहिती - आपल्या कुटुंबाला आपल्या निर्णयाची माहिती द्यावी, कारण मृत्यूनंतर त्यांची संमती आवश्यक असते.

४. वैद्यकीय प्रक्रिया - ब्रेन डेड किंवा मृत व्यक्तीच्या अवयवांचे त्वरित संकलन करून प्रत्यारोपणासाठी योग्य रुग्णाला दिले जाते.

**अवयवदानातील अडथळे**

■ धार्मिक आणि सांस्कृतिक गैरसमज

■ ब्रेन डेडची अपुरी माहिती

■ कायदेशीर प्रक्रिया जटिल असल्याची भीती

■ रुग्णालयातील सुविधांची कमतरता

■ कुटुंबाचा भावनिक विरोध

**धार्मिक दृष्टिकोन**

**भारतातील बहुतांश धर्म अवयवदानाला मान्यता देतात.**

■ हिंदू धर्म - दान हे सर्वश्रेष्ठ कर्म मानले जाते.

■ इस्लाम - जीव वाचवणे हे पुण्याचे कार्य मानले जाते.

■ ख्रिश्चन धर्म - प्रेम व सेवा हे सर्वोच्च मूल्य मानले जाते, त्यामुळे अवयवदान प्रोत्साहित केले जाते.

■ बौद्ध धर्म - करुणा आणि परोपकार यांना महत्त्व.

**माझा वैद्यकीय अनुभव**



एक स्त्रीरोगतज्ज्ञ आणि वंध्यत्व तज्ज्ञ म्हणून, मी अनेकदा रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबांच्या भावना जवळून अनुभवल्या आहेत. एखाद्या आईचे यकृत निकामी होऊन ती मुलांपासून दुरावताना पाहणे किंवा तरुण वडिलाला हृदय प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत दिवस मोजताना पाहणे ही वेदना शब्दात सांगता येत नाही.

परंतु जेव्हा एखादा अवयव मिळतो आणि तो रुग्ण पुन्हा आनंदाने जीवन जगू लागतो, तेव्हा हे 'दान' किती जीवनदायी आहे याची जाणीव होते.

**जागरूकता कशी वाढवावी?**

■ शाळा, महाविद्यालये, समाजसंस्था यामध्ये अवयवदानावर व्याख्याने, कार्यशाळा आयोजित करणे.

■ सोशल मीडियावर मोहिमा चालवणे.

■ रुग्णालयांमध्ये माहितीपत्रके वाटप करणे.

■ स्थानिक नेते, कलाकार, प्रभावशाली व्यक्तींना या मोहिमेत सहभागी करणे.

**आपण काय करू शकतो?**

■ अवयवदानासाठी नोंदणी करणे.

■ आपल्या कुटुंबाला निर्णय कळवणे.

■ अवयवदानाविषयीचे गैरसमज दूर करणे.

■ इतरांना प्रेरित करणे.

अवयवदान हे फक्त दान नाही, तर एक पवित्र कर्तव्य आहे. आपण मृत्यूनंतर आपल्या अवयवांद्वारे कोणाचे तरी जीवन वाचवू शकतो, त्याला नवसंजीवनी देऊ शकतो. मृत्यू अपरिहार्य आहे, पण आपल्या मृत्यूनंतर आपल्या अवयवांनी दुसऱ्याच्या शरीरात धडधडत राहणे हे अमरत्वाचेच एक रूप आहे.

**- डॉ. मीनल चिडगुपकर**
**स्त्रीरोग व प्रसूती शास्त्रतज्ज्ञ**
**फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा, मेडिकल सब कमिटी मेंबर**
**मो. नं. ९८९०८३८८८४**

# महापालिका शिक्षण विभागाच्या दुर्लक्षावर प्रश्नचिन्ह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई महानगरपालिकेच्या बालवाडीतील शिक्षिका व मदतनीस यांच्या वेतन आणि मूलभूत सोयी-सुविधांबाबतच्या गंभीर मुद्द्यावर शिक्षण विभागाच्या प्रतिसादाची चौकशी सुरू असून, अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे विभागाच्या भूमिकेबाबत शंका उपस्थित झाली आहे.

मुंबई महानगरपालिकेमध्ये कार्यरत बालवाडीतील शिक्षिका आणि मदतनीस यांच्या बँक खात्यात दर महिन्याला जमा होणाऱ्या पगारासंबंधीचे पुरावे, त्यांना दिल्या जाणाऱ्या मूलभूत सोयी-सुविधा आणि संबंधित आदेश याबाबत १३ ऑगस्ट रोजी कामगार उपआयुक्त (वांद्रे कोर्ला कॉम्प्लेक्स) अतुल सावरकर यांनी महापालिका शिक्षण अधिकारी सुजाता खरे यांना नोटीस बजावली होती. या नोटीसीनुसार त्यांना प्रत्यक्ष हजर राहणे अपेक्षित होते. मात्र, आज त्या उपस्थित राहिल्या नसल्याचे दिसून आले.

यामुळे महापालिका शिक्षण विभाग या गंभीर विषयाकडे दुर्लक्ष करत आहे का, किंवा त्यांच्या कडे बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांच्या वेतन जमा झाल्याचे पुरावे उपलब्ध नाहीत का, किंवा अनेक वर्ष रजा सोई सुविधा गरोदरपणाचा राजा याच्या निधीत फार मोठ जपला झाला आहे का अशा अनेक शंका आमच्या समोर उभे राहिले आहेत असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.

त्यामुळे कामगार आयुक्तांनी दिलेल्या तारखेला गैरहजर राहणे याच्यामुळे आम्ही जे नेहमी म्हणत होतो की बालवाडी शिक्षक मदतनीस यांच्यावरती चाचक अटी लागणं आणि यांना शोषण करणे केंद्र सरकार व महाराष्ट्र शासनाच्या धोरणांना न मानना हे यातून शंकेला वाव निर्माण झाली आहे लवकरच या संदर्भात माननीय आयुक्तांना भेटून बालवाडी सेविका म्हणजेच शिक्षक मदतनीस यांना वर्षानुवर्ष पगारापासून वंचित ठेवणे यांना अधिकारापासून वंचित ठेवणं आणि संस्थेला महापालिकेच्या कामगार कार्यालयाला संपर्कात न घेता शिक्षण विभागाचे संबंधित अधिकारी आणि संस्थाचालक यांच्यात काही मोठा फार गफला झाल्याचा आम्हाला वाटत आहे याच्यातून मोठा भ्रष्टाचार झाल्याचं देखील आम्हाला वाटत आहे ज्या पद्धतीने आज शाळा बंद होत चाललेली आहेत परस्पर चांगल्या शाळा बंद करत चाललेल्या आहेत तशाच पद्धतीचा हा बालवाडी खपला आहे का हा आता आमचा प्रश्न तयार झालेला आहे असे आम्हाला वाटू लागले आहे या विषयावरती पत्रकार बांधवांनी आम्हाला सहकार्य करावे ही आपणास विनंती आपला नम्र कामगार नेते रमेश मारुती जाधव ९८६७०८७२५१

## भिवंडी कल्याण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील पडघा खडवली रस्त्यावर खड्डे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी, कल्याण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असलेल्या मध्य रेल्वेच्या खडवली स्टेशनकडे जाणाऱ्या पडघा, खडवली रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडल्याने वाहनचालक त्रस्त आहेत.

पडघा व परिसरातील शेकडो चाकरमानी, रोजंदारी कामगार, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, व्यावसायिक मध्य रेल्वेच्या खडवली स्टेशनवरून मुबंई, उपनगर, आसनगाव, शहापुर, कसारा, येथे दररोज जात असतात तसेच पडघा खडवली रस्त्यालगत असलेल्या गावामधील व याच रस्त्याचा वापर करून टिटवाळा, गोवेली, बदलापूर, मुरबाड कर्जत जाण्यासाठी नागरीक जात - येत असतात त्यामुळे या रस्त्यावर दिवस रात्र वाहनांची वर्दळ असते.

मात्र कल्याण सार्वजनिक बांधकाम विभागाकडील रस्त्यावर स्वामी समर्थ मंदीराजवळ, भातसा नदीवरील पुलाजवळील वळणावर व भिवंडी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील खडवली फाटा, आन्हे पाडा ते मातोश्री वृध्दाश्रम, सोरगांव दरम्यान रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. तसेच काही ठिकाणी गतीरोधकाच्या दोन्ही बाजूला खड्डे पडल्यामुळे वाहन चालकांना वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे तर या खड्डुयामंध्ये वाहने आदळून नादुरुस्त होऊन व रात्रीच्या वेळी अपघाताची भिती व्यक्त करण्यात येत आहे तरी कल्याण व भिंवडी सार्वजनिक बांधकाम विभागाने हा रस्ता दुरुस्त करावा अशी मागणी वाहनचालकांनी केली आहे.

## 'हर घर तिरंगा' मोहिमेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## मुख्याधिकारी महेश रोकडे यांची माहिती

# हर घर तिरंगा मोहिम; पंढरपुरात भव्य तिरंगा रॅली संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'हर घर तिरंगा' मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी पंढरपूर नगरपरिषदेच्यावतीने आज भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. तिरंगा रॅलीस शहरातील विविध विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७८ व्या वर्धापनदिना निमित्त पंढरपूर नगरपरिषदेच्या वतीने लोकांमध्ये राष्ट्रध्वजाबद्दल जागरूकता निर्माण करणे, देशभक्तीची भावना जागृत करणे आणि राष्ट्रध्वजासोबत प्रत्येक नागरिकाचा वैयक्तिक बंध जोडणे, या उदात्त उद्देशाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सदर रॅलीमध्ये लोकमान्य विद्यालय, गौतम विद्यालय, कवठेकर प्रशाला, द.ह कवठेकर प्रशाला , अरिहंत विद्यालय, आपटे उपलप प्रशाला, ईश्वर अम्मा प्रशाला, यशवंत विद्यालय, विवेक वर्धिनी विद्यालय, औदुंबर पाटील विद्यालय आदी शाळांचे विद्यार्थी व शिक्षक यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.






भारत माता की जय, वंदेमातरम्, वंदेमातरम्, भारतीय स्वातंत्र्याचा विजय असो, घर-घर तिरंगा हर घर तिरंगा च्या जयघोषाने शहरातील वातावरण देशभक्तीमय, देशभक्तीने मंत्रमुग्ध झाले होते. प्रत्येक विद्यार्थ्याच्या हाथी तिरंगा झेंडा फडकवीत सदर रॅली शिस्तबध्द रीतीने पार पडली. सदर रॅली शहरातील प्रदक्षिणा मार्गावरून संचलन करीत जिजामाता उद्यान येथे समाप्त झाली. रॅलीमध्ये नगरपरिषद अधिकारी, कर्मचारी व पंढरपूर शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होत.

## शासकीय ध्वजारोहण समारंभाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७८ व्या वर्धापनानिमित्त तहसिल कार्यालय, पंढरपूर येथे शुक्रवार दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९.०५ वाजता ध्वजारोहणाचा शासकीय समारंभ होणार आहे.

उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहणाचा समारंभ संपन्न होणार असून, या समारंभास मान्यवर नागरीक, स्वातंत्र्य सैनिक तसेच शासकीय-निमशासकीय कर्मचा-यांनी उपस्थित रहावे असे, आवाहन तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# अवयवदान जीवनदान संजीवनी जनजागृती, रॅलीमध्ये तीन हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

## डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित अवयवदान महाअभियानाचा शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : अवयवदान हे मोठे सामाजिक काम असून, प्रत्येक गरजू रुग्णांना अवयव मिळायलाच पाहिजे. अवयवदात्याची गरज असलेले मोठ्या प्रमाणात रुग्ण असून प्रत्येकाने अवयवदान करावे असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र. कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी केले. डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित अवयवदान महाअभियानाच्या शुभारंभाप्रसंगी ते बोलत होते.



या कार्यक्रमाला डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर, उपअधिष्ठाता डॉ. नरेश झंजाड, अश्विनी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुहास कुलकर्णी, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनचे डॉ. श्रीकांत येळेगांवकर, डॉ.एन.बी. तेली, डॉ. संतोष हराळकर, अश्विनी सहकारी रुग्णालयाचे संचालक श्री. अशोक लांबतुरे, वैद्यकीय अधिक्षक डॉ. प्रशांत औरंगाबादकर, प्रशासकीय अधिकारी श्री. सचिन बिज्जरगी व सोलापूर विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख डॉ. राजेंद्र वडजे, डॉ. अभिजीत जगताप, डॉ. तोडकर इत्यादी उपस्थित होते.

किडनी, त्वचा, डोळे, यकृत, फुफ्फुस यासारखे अवयव आपण दान करु शकतो व आपण सर्वांनी आजच्या दिवशी अवयवदानाचा संकल्प करुन अर्ज भरावा, असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर, यांनी केले व या रॅलीचे स्वागत व सूत्रसंचालन श्री. अशोक लांबतुरे यांनी केले. यावेळी डॉ. प्रदीप जाधव, समन्वयक, अवयवदान समिती यांनी अवयवदानाची उपस्थितांना शपथ दिली.

जागतिक अवयवदान दिनाचे औचित्य साधून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर व बार्शीचे विकास चव्हाण यांनी अवयवदान व देहदान करण्याचा संकल्प केला

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रांगणातून या रॅलीचा शुभारंभ प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते रॅलीला हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला. सदर जनजागरण दिंडी (रॅली) डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथून प्रारंभ पोटफाडी चौक - सिध्दार्थ हौसिंग सोसायटी - कुंभार गल्ली - जगदंबा चौक - लष्कर सात रस्ता - संगमेश्वर कॉलेज मार्गे गरुड बंगला रोटरी बगीचा मार्ग - भगतसिंग मार्केट - अश्विनी सहकारी रुग्णालयाच्या मैदानामध्ये समारोप करण्यात आला. डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय व एम.एम. पटेल पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचलित अश्विनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय व संशोधन केंद्र कुंभारी व अश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र नियमित, सोलापूर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ (राष्ट्रीय सेवा योजना विभाग) व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने यांच्या संयुक्त विद्यमाने ही रॅली काढण्यात आली.

या रॅलीमध्ये कमलाबेन पटेल नर्सिंग कॉलेज, कुंभारी, अश्विनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, कुंभारी, अश्विनी नर्सिंग इन्स्टिट्युट, सोलापूर, डीबीएफ दयानंद कॉलेज, डीबीएफ दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, नर्सिंग कॉलेज सिव्हिल हॉस्पिटल, देहांगदान जीवनदान संस्था समाजसेवी संस्था, संगमेश्वर महाविद्यालय, यु.ई.एस. महिला महाविद्यालय, अश्विनी पॅरामेडिकल कॉलेज, सोलापूर मार्कंडेय रुग्णालय, भाई छन्नुसिंग चंदेले समाजशास्त्र महाविद्यालय, हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, हरिभाई देवकरण कॉलेज, शिवदारे कॉलेज ऑफ फार्मसी, सोशल कॉलेज, ए.आर. बुर्ला महिला विद्यालय, एस.एस.ए. कॉलेज, सोलापूर, यशोधरा नर्सिंग इन्स्टिट्यूट, सोशल कॉलेज, डीएव्ही वेलणकर कॉलेज, संगमेश्वर कॉलेज ९ महाराष्ट्र बटालियन, छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज, रोटरी क्लब ऑफ सोलापूर मुख्य, मंगळवेढेकर कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय, समाजकार्य विभाग, दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय इत्यादी सहभागी होते.

याप्रसंगी विकास लिंगराज, प्रा. नंदकिशोर सगरे, प्रा. मधुराणी मोहिते, डॉ. मनिषा शिंदे, राजश्री काळे, डॉ. हराळकर, बाबुराव चांदकवटे, विरेंद्र परदेशी, डॉ. एस.एस. पाटील, कॅप्टन अजित जाधव, एस.एस. जगताप, व्ही.एम. मुलगे, प्रा. विजय मोरे, प्रा. घोंगडे, प्रा. युवराज सुरवसे, धनश्री केळकर, राजू नरळे, डॉ.ए.जी. जमादार, डॉ.व्ही.जी. सुरवसे, ए.व्ही. बेडगकर, डॉ. के.जी. शिंदे, डॉ. एम.एम. पिरजादे, वैशाली इंडे, प्रा.डॉ. पाटणकर, डॉ. एस. शिंदे, डॉ. ए.व्ही. साखरे, प्रा. डॉ. दीपक नारायणकर, राजू माने आदी उपस्थित होते.

या रॅलीच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम डेप्युटी पी.ई. स्वप्नील लांबतुरे, फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी, आकाश गायकवाड, कल्पना गडगडे, सुकेशनी, सोनकांबळे, उमेश शिवशरण, अवधूत कुलकर्णी, मनोज परदेशी, सुर्यकांत कवलगी, नागराज दंतकाळे, नीळकंठ चौगुले, अविनाश गायकवाड यांनी घेतले.

या रॅलीचे समारोपप्रसंगी आभारप्रदर्शन प्रा.डॉ. श्रीकांत येळेगांवकर यांनी केले.

# १५ ऑगस्टला रत्नपुरी ते जंक्शन चौक शेती महामंडळ कामगारांचा सत्याग्रह; पायी मोर्चा व आमरण उपोषण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर तालुक्यातील वालचंदनगर येथील शेती महामंडळ कामगारांची थकित देयके, जमीन वाटप, राहण्यासाठी जागा, वेतन आयोगाचा फरक आणि इतर प्रलंबित मागण्यांच्या संदर्भात १५ ऑगस्ट रोजी रत्नपुरी ते जंक्शन चौक असा सत्याग्रह पायी मोर्चा काढण्यात येणार आहे. याबाबतची माहिती मंगळवारी (दि.१२) इंदापूर येथील शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली. या पत्रकार परिषदेत सागर मिसाळ, शेखर काटे, ड. संजय चंदनशिवे, आकाश पवार यांच्यासह शेती महामंडळाचे कामगार उपस्थित होते.



कामगारांनी सांगितले की, तत्कालीन महसूल मंत्री मा. रामराजे निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करावी, कायम कामगारांना २ हेक्टर जमीन द्यावी, १९ कोटी ५० लाख रुपये थकित देयके द्यावीत, २ गुंठे राहण्याची जागा द्यावी, ४ था व ५ वा वेतन आयोगाचा फरक द्यावा, तसेच ७ वा आणि ८ वा वेतन आयोग लागू करावा. याशिवाय २०१५ सालची ६ व्या वेतन आयोगाची देयके मंजूर करून द्यावीत.

त्यांनी स्पष्ट केले की, या मागण्या तातडीने पूर्ण न झाल्यास सत्याग्रह पायी मोर्चानंतर आणखी तीव्र आंदोलन छेडले जाईल. तसेच या मोर्च्या नंतर सागर मिसाळ, शेखर काटे आणि आकाश पवार हे सदरील मागण्या संदर्भात जंक्शन येथे अन्नत्याग आंदोलन करणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. शेती महामंडळाच्या कामगारांचे प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित असून शासनाने याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# प्रेमराज बागल यांची महाराष्ट्र पोलीस दलात निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील गादेगाव येथील प्रेमराज दिलीप बागल यांची नुकतीच महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस चालक पदावर यशस्वी निवड झाली आहे. व त्यांच्या यशाबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार पक्षाचे उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या हस्ते शाल, पुष्पहार, घालून सत्कार केला यावेळी

**प्रेमराज बागल यांचा सन्मान शरदचंद्र पवार पक्षाचे उद्योग व व्यापार प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या हस्ते संपन्न**



प्रेमराज बागल यांचे वडील दिलीप बागल यांचाही सन्मान करण्यात आला याप्रसंगी प्रेमराज बागल यांनी यशस्वी निवड होण्याची परिश्रम घेतलेली माहिती उपस्थित समोर मांडली. त्याचे यश इतर तरुणांनी प्रेरणादायी ठरले आहे. अशी मत नागेश पाटील यांनी व्यक्त करून पुढील त्यांच्या कार्यात शुभेच्छा दिल्या.

यावेळी उपस्थित हरिभाऊ काळे, डॉक्टर रमेश फाटे, सौरभ काळे, संग्राम कापसे, ज्ञानेश्वर पवार, आधी जण उपस्थित होते.

# प्लॅस्टिक राष्ट्रध्वजाचा वापर व निर्मिती करु नये

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : केंद्र शासनाच्या गृहमंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रध्वजाकरिता प्लॅस्टिकच्या वापरास व निर्मितीस मनाई आहे. भारतीय राष्ट्रध्वज संहितेचे काटेकोर पालन करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत प्लास्टीकचे राष्ट्रध्वज वापर व निर्मिती करण्यात येऊ नये असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

राष्ट्रध्वजाविषयीचे प्रेम, निष्ठा, अभिमान दर्शविण्याकरिता विद्यार्थी नागरिकांकडूनदेखील राष्ट्रध्वजाचा वापर करण्यात येतो. कार्यक्रमानंतर राष्ट्रध्वज विविध सार्वजनिक ठिकाणी टाकले जातात. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होतो. रस्त्यात इतरत्र विखुरलेले राष्ट्रध्वज बरेच दिवस नष्ट होत नाहीत. राष्ट्रप्रतिष्ठेच्या दृष्टीने ही बाब गंभीर आहे.. राष्ट्रध्वजाचा अवमान करणे त्याची विटंबना होणे हे बोधचिन्हे नावे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम १९५० राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१ तसेच ध्वजसंहितेच्या तरतुदीनुसार दंडनीय अपराध आहे.

खराब झालेले, राष्ट्रध्वज आढळून आल्यास ते सन्मानपूर्वक गोळा करुन नजीकच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयामध्ये जमा करावेत. तसेच नागरिकांनी ध्वज संहितेच काटेकोर पालन करावे असे आवाहनही प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

# श्रावण मासानिमित्त खोलेश्वर महादेव रथाच्या मिरवणुकीची पूजा माजी आमदार संजय मामा शिंदे यांच्या हस्ते संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पवित्र श्रावण मासानिमित्त करमाळा शहरातील किल्लावेसीतील राजे रहे होंबा काळातील खोलेश्वर महादेवाची रथयात्रा मिरवणूक श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारी करमाळा शहराच्या प्रमुख मार्गावरून जात असून करमाळा शहरातील जागृत देवस्थान म्हणून पेशवेकालीन असलेल्या महादेव खोलेश्वर रथाची मिरवणूक दरवर्षी सालाबाद प्रमाणे तिसऱ्या सोमवारी निघत असून खोलेश्वर महादेव रथाच्या मिरवणुकीची पूजा माजी आमदार संजय मामा शिंदे यांच्या हस्ते करण्यात आली.





रावडी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भारत भाऊ अवताडे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष नानासाहेब गोरे, युवा नेते अमोल सिंह परदेशी, खोलेश्वर महादेव मंदिराची पुजारी नागेश गुरव, रथाचे मानकरी गणेश झोळ, रथ वाढण्याची मानकरी सुखदेव लष्कर सामाजिक कार्यकर्ते क्षणिक शेठ खाटेर, नगरसेविका संगीता ताई खटिल, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अजिंक्य पाटील व खोलेश्वर मंडळाची सर्व सदस्य महादेव भक्त मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते व करमाळा शहरातील जागृत देवस्थान म्हणून पेशवेकालीन असलेल्या महादेव खोलेश्वर रजाची मिरवणूक दरवर्षी सालाबाद प्रमाणे तिसऱ्या सोमवारी निघण्याची परंपरा कायम चालू आहे.

**देशभर दि. ०२ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत साजरा केला जातोय हा राष्ट्रीय उपक्रम**

# स्वेरीत 'हर घर तिरंगा अभियान'चे उद्‌घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- राष्ट्रीय सेवा योजना विभाग, पु.अ. हो. सोलापूर विद्यापीठ सोलापूर तसेच महाराष्ट्र शासनाच्या उच्चतंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या आदेशानुसार गोपाळपूर (ता. पंढरपूर) मधील स्वेरीमध्ये 'हर घर तिरंगा अभियाना' चे आज उदघाटन करण्यात आले.

'हर घर तिरंगा अभियान' संपुर्ण देशामध्ये दि. ०२ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत साजरा करण्यात येत आहे. सूचनेनुसार स्वेरीमध्ये स्वेरीचे संस्थापक व प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. प्रारंभी प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी शासनाच्या परिपत्रकानुसार 'हर घर तिरंगा अभियान' चे महत्व पटवून सांगितले. संस्थेचे नूतन सचिव प्रा. सुरज रोंगे यांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आले. 'हर घर तिरंगा' उपक्रम राबविताना भारतीय ध्वज संहितेचे पालन केले जात असून अजाणतेपणी राष्ट्रध्वजाचा अवमान होऊ नये याबाबतची दक्षता घेण्यात येत आहे. या विषयी नागरिकांमध्ये जनजागृती करुन विशेष काळजी घेण्यात येत आहे. हर घर तिरंगा अभियान प्रसंगी उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, इन्फ्रास्ट्रक्चर अधिष्ठाता डॉ.डी.ए. तंबोळी, अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया अधिष्ठाता डॉ. के.बी.पाटील, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम.एस. मठपती, प्रशासन अधिष्ठाता डॉ. आर.आर. गिड्डे, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. एन.यु. कौटकर, संशोधन विभागाचे अधिष्ठाता डॉ. ए.पी. केने, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ.आय. सी. मैतीय, सिव्हील इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ.पी.आर.बामणे, इंटर्नल क्वालिटी अशुरन्स सेलचे समन्वयक डॉ.एस.एस. वांगीकर, एम.बी.ए. विभागाच्या प्रमुख डॉ. एम.एम.भोरे, तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.अमोल चौंडे यांच्यासह इतर विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.



## थोडक्यात...




### अंबिका नगर येथून दुचाकी पळवली

सोलापूर (प्रतिनिधी) अंबिका नगर येथे हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.बीसी.७२०२ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १९ जुलै रोजी घडली. याप्रकरणी जमीर चाँदसाह शेख (मुक्काम पोस्ट गुळवंची) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस नाईक भिमदे हे करीत आहेत.

### हँडल लॉक केलेली दुचाकी लंपास

सोलापूर (प्रतिनिधी) हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम एच.१३.ईबी.१३६६ ही दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना जाधव पान शॉप अक्कलकोट रोड येथे ७ ऑगस्ट रोजी घडली.याप्रकरणी सोहेल सलीम नदाफ (वय-२३,रा.रामवाडी, अंबाबाई मंदिर जवळ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार नदाफे करीत आहेत.

### जागेवर खोदकाम करण्यावरून मारहाण

सोलापूर (प्रतिनिधी) जागेवर खोदकाम करण्याच्या कारणावरून शिवीगाळ करत मारहाण केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ११ ऑगस्ट रोजी जगजीवनराम झोपडपट्टी मोदीखाना सोलापूर येथे घडली. याप्रकरणी किशोर सिद्राम तलवारे (रा.जगजीवनराम झोपडपट्टी मोदीखाना) यांनी सदर बाजार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे त्यांच्या फिर्यादीवरून दशरथ बोंललेलू व रुपा दशरत बोंललेलू (रा. जगजीवनराम झोपडपट्टी मोदीखाना) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की फिर्यादी व फिर्यादी यांचा मित्र कृष्णा भलके असे मिळून खरेदी केलेल्या मिळकत क्रमांक ५११ या मोकळ्या जागेत पत्रा शेड मारण्यासाठी कामगारास खड्डे काढण्यासाठी सांगितले.त्यावेळी कामगार खड्डे खांदत असताना वरील संशयित आरोपी यांनी येऊन कोणास विचारून खड्डे मारत आहे.असे म्हणून शिवीगाळ करत खोऱ्याच्या दांडक्याने फिर्यादी व फिर्यादी यांची पत्नी तसेच फिर्यादी यांचा भाऊ दीपक यांना मारहाण करून दुखापत केली.तसेच जागेवर घर कसे बांधता ते बघतो असे म्हणून धमकी देऊन रूपा हिने फिर्यादी यांच्या पत्नीस मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास महिला पोलीस हवालदार चव्हाण हे करीत आहेत.

# दर्शनरांगेतील बॅरिकेटींग कामाची ई निविदा व गोशाळेतील नवजात वासरू मयत झालेबाबतच्या दोन्ही प्रकरणांच्या चौकशीचा अहवाल प्राप्त

## सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : दर्शनरांगेतील बॅरिकेटिंग कामाच्या ई निविदेबाबत श्री पुरुषोत्तम सग्गम, सोलापूर यांची आर्थिक फसवणूक प्रकरणी तसेच गोशाळेतील नवजात वासरू मयत प्रकरणी मंदिर समितीच्या दि.२३ जुलै रोजीच्या सभेतील निर्णयानुसार मंदिर समितीच्या सदस्या अॅड. माधवी निगडे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. या समितीचा अहवाल प्राप्त झाला असल्याची माहिती सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.



सदर अहवालाच्या अनुषंगाने मंदिर समितीची दि.१३ ऑगस्ट रोजी दुपारी २.३० वाजता मंदिर कार्यालयात सह अध्यक्ष औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा संपन्न झाली. या सभेत सदस्या शकुंतलाताई नडगिरे, डॉ दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, अॅड. माधवीताई निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरूजी, ह.भ.प.शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, प्रभारी व्यवस्थापक मुकेश अनेचा उपस्थित होते.

या सभेत मंदिर समितीच्या दि.२३ जुलै रोजीच्या सभेतील निर्णयानुसार नियुक्त केलेल्या चौकशी समितीचा अहवाल स्विकारण्यात आला. याशिवाय, व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांना अधिनियमातील तरतुदीनुसार शासनास परत पाठविण्याचा तसेच श्री सग्गम यांचेवर अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणेकामी ठराव मंजुर करून शासनास मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविणे तसेच गोशाळेतील वासराच्या मृत्यू प्रकरणी पशुवैद्यकीय अधिकारी प्रशांत सर्वगोड, तानाजी जाधव व योगेश पाठक हे कर्मचारी सकृतदर्शनी दोषी असल्याचे दिसून आले आहे. याशिवाय पशुवैद्यकीय अधिकारी प्रशांत सर्वगोड यांच्याकडे पशुवैद्यकीय अधिकारी पदाची शैक्षणिक पात्रता नसल्याने त्यांची सेवा समाप्त करण्याचे निर्णय घेण्यात आल्याची माहिती चौकशी समितीचे अध्यक्ष अॅड. माधवीताई निगडे यांनी सांगीतले.

# हजरत शेख नुरुद्दीन बाबा चिस्ती र.हि यांच्या उरूस निमित्त भाविकांना प्रसाद वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट: अक्कलकोट शहरातील सर्व हिंदू मुस्लिम भाविकांचे श्रद्धास्थान असलेले हजरत शेख नुरुद्दीन बाबा चिस्ती र.हि यांच्या उरूस निमित्त प्रति वर्षाप्रमाणे यंदाच्या वर्षीही श्री.स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे विश्वस्त अमोल राजे भोसले यांच्या सहकार्याने हजरत शेख नुरुद्दीन बाबा चिस्ती ऊर्स निमित्त आलेल्या भाविकांना गोडप्रसाद व फळ वाटप श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले.

तसेच नाईकवाडी गल्ली यंग कमिटीच्या वतीने हजरत शेख नुरुद्दीन बाबा चिस्ती र.हि यांच्या उरूस निमित्त काढण्यात येणाऱ्या चादर मिरवणुकीचे उद्घाटन अमोल राजे भोसले, महेश हिंडोळे,उत्तम गायकवाड, दिलीप सिद्धे, मल्लिकार्जुन पाटील, अविनाश मडीखांबे, मैनुद्दीन कोरबु, नन्नू कोरबु या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थिती करण्यात आले.

या वेळी शाकीर पटेल, आझम शेखजी, इरफान कोरबू, भैया नाईकवाडी, वाहिद नाईकवाडी, अल्ताफ कोरबू, सामाजिक कार्यकर्ते सोहेल फारस, शकील नाईकवाडी, नवीद डांगे, सलीम शेख, बुडन कोरबू, युनूस शेख, दाऊद शेख, मुबारक कोरबू, सादिक बागवान, अस्लम कोरबू, बाबा नाईकवाडी, इरफान शेख, इम्रान पठाण, खालील नाईकवाडी, दाऊद मुजावर, कादिर नाईकवाडी, जोएब कोरबू,नबीलाल नाईकवाडी, शबाब मुजावर,एजाज नाईकवाडी,तन्वीर सुतार,गौस शेख, व इतर मान्यवर व नाईकवाडी गल्ली यंग कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

हजरत शेख नुरुद्दीन बाबा चिस्ती र.हि यांच्या उरूस निमित्त महिलांना साड्या वाटप.

अक्कलकोट: अक्कलकोट शहरातील सर्व हिंदू मुस्लिम भाविकांचे श्रद्धास्थान असलेले हजरत शेख नुरुद्दीन बाबा चिस्ती र.हि यांच्या उरूस निमित्त मौलाली गल्ली यंग कमिटी अक्कलकोट तर्फे गरीब व गरजवंतू महिलांना नगरसेवक सद्दाम शेरीकर,बाबा सालार, गालिब अण्णा काझी, अहेमद शेख, प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते साड्या वाटप करण्यात आले.

या वेळी मौला मुल्ला, अशपाक खिस्तके, सामाजिक कार्यकर्ता सोहेल फरास,बबलु खिस्तके, टिपू गोलंदाज,मुकतार शेख, वसीम शेख, शकील खिस्तके, ताजु शेख,साकिब खिस्तके, एजाज चाबुकस्वार, तोसिफ डांगे व मौलाली गल्ली इन कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

# विर श्री मालोजीराजे गढी शेजारच्या गोरगर मुसू समाजातील घरांवर बुलडोझर फिरवून बेघर केलेल्यांचे तात्काळ पुनर्वसन करावे; उर्वरित अतिक्रमण तात्काळ हटवण्यात यावे अन्यथा तीव्र आंदोलन करु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/ अतुल सोनकांबळे :



इंदापूर शहरातील मालोजीराजे गढीवरील अतिक्रमण प्रकरणात तालुका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने प्रशासनावर पक्षपाताचा आरोप करत तात्काळ उर्वरित अतिक्रमण हटविणे आणि बेघर झालेल्या गोरगरीब कुटुंबांचे पुनर्वसन करण्याची मागणी केली आहे.

आर पी आय चे तालुकाध्यक्ष बाळासाहेब सरवदे यांनी मंगळवारी (दि. १२) या संदर्भाचे निवेदन तहसीलदारांना दिले.

सरवदे यांनी निवेदनात म्हटले आहे की, गढीचे संवर्धन व सुशोभीकरणाचे काम सुरू असताना, गढीचा मूळ नकाशा आणि मोजमाप निश्चित करून सर्व अतिक्रमणे हटवणे आवश्यक होते. मात्र, ११ ऑगस्ट रोजी पावसाळ्याच्या काळात गोरगरीब मुस्लिम धर्मियांची ६०-७० वर्षांपासून असलेली घरे अतिक्रमण म्हणून पाडण्यात आली.

याउलट धन दांडगे आणि जात दांडगे यांच्या अतिक्रमणाला संरक्षण देऊन बदमाश गिरी केली आहे. गोरगरीब फकीर लोकांना बेघर करून प्रशासनाने त्यांच्यावर अन्याय केला आहे.

बाधित कुटुंबांना तात्काळ निवारा देऊन त्यांचे पुनर्वसन करावे, तसेच

**आर पी आय आठवले गट तालुका अध्यक्ष बाळासाहेब सरवदे यांची निवेदनाद्वारे मागणी**

गढीवरील उर्वरित अतिक्रमण तात्काळ काढावे, अन्यथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही प्रशासनाला देण्यात आला आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थेचा निवडणूकीसाठी कार्यकर्त्यांनी सज्ज रहावे : अविनाश मडिखांबे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक लढण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चा कार्यकर्त्यांनी सज्ज रहावे असे प्रतिपादन अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी व्यक्त केली आहे.



अक्कलकोट येथील भक्तनिवास येथे आज प्रदेश अध्यक्ष लोकनेते राजाभाऊ सरवदे साहेब यांच्या वाढदिवस व आगमी स्थानिक स्वराज संस्थेचे निवडणूक या संदर्भात बैठक आयोजित करण्यात आला होता.या बैठकीचे अध्यक्षस्थानी अविनाश मडिखांबे हे होते.या प्रसंगी रिपाइं सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी,शहर अध्यक्ष अजय मुकणार,युवक जिल्हा सरचिटणीस विजयकुमार पोतेनवरु,ता सचिव राजु बगळे व मलकण्णा सोनकांबळे यांच्या कार्यकर्ता मार्गदर्शनपर समयोचित व अविनाश मडिखांबे यांच्या अध्यक्षीय भाषणे झाली.

या प्रसंगी रिपब्लिकन पक्ष(आठवले)राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री मा.डॉ.रामदास आठवले यांच्या पुनश्च राष्ट्रीय अध्यक्षपदी अविरोध निवड झाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव या प्रसंगी पास करण्यात आली आहे. व सालाबादा प्रमाणे लोकनेते मा राजाभाऊ सरवदे साहेब यांच्या वाढदिवस नियोजन बद्द व आगळा वेगळा पध्दतीने करण्याचे सर्वानुमते ठराव संमत करण्यात आली आहे.व स्थानिक स्वराज संवस्थेच्या अक्कलकोट, दुधनी, मैंदर्गी,जिल्हा परिषद-पंचायतसमिती व ग्रामपंचायत निवडणुक लढण्यासाठी रुपरेषा या बैठकीत आखण्यात आली.या बैठकीत प्रारंभी युवक ता अध्यक्ष अप्पा भालेराव यांनी सर्वांचे स्वागत केली. सूत्रसंचालन ता उपाध्यक्ष अंबादास गायकवाड यांनी तर शेवटी शहर सरचिटणीस शुभम मडिखांबे यांनी आभार प्रदर्शन केले.

या बैठकीत सूरज सोनके, चंद्रकांत गायकवाड, रवी सलगर, कृष्णा धोडमनी, सुरेश गायकवाड, दस्तगीर मुजावर, गोरखनाथ धोडमनी, राजु कांबळे, प्रकाश गडगडे, दिलिप माळी, तम्मा दसाडे, उमेश शिवशरण, राजशेखर गायकवाड, लालू चव्हाण, यमनप्पा शिंदे, रमेश बनसोडे, राजु शिंदे, नितेश मडिखांबे, अंबादास बनसोडे, भीम मडिखांबे, भीमा गायकवाड, नागेश बाबर, नागेश कलाल, बसवराज मडिखांबे, सचिन बनसोडे, अजय मडिखांबे, अनिल धसाडे व इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होता.

**विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग : राखी, पोस्टर, निबंध, रांगोळी**

**विविध कवायतींचे होणार सादरीकरण**

# नंगपूरामुर्री निवासी शाळेत हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत विविध स्पर्धा आयोजन








**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोदिंया : शहराला लागून असतेले नंगपूरामुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा याठिकाणी शासनाच्या हर घर तिरंगा या उपक्रमाच्या उद्देशाने शाळेत वेगवेगळ्या दिनांकासह वेगवेगळ्या दिवशी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी शाळेतील मुख्याध्यापक रविशंकर ईठूले यांच्या अध्यक्षतेखाली शाळेतील शिक्षक आशिष शहारे, साधना पारधी नीता भलमे, मुन्नाभाई नंदागवळी, पुष्करराज लांजेवार, प्रदीप ढवळे, कार्तिक शहारे, दीक्षा तुरळक व तुषार महाजन आदी उपस्थित होते.

शासनाच्या परिपत्रकानुसार दिनांक २ आगस्टपासून शाळेत विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये वर्ग सहावी ते दहावी वर्गातील विद्यार्थी सहभागी झाले. ४ आगस्टला राखी मेकिंग स्पर्धा, ५ आगस्टला चित्रकला म्हणजे पोस्टर स्पर्धा, ६ ला निबंध स्पर्धा, ७ हर घर तिरंगा प्रमाणे हर घर स्वच्छता करण्यात आली, ११ आगस्टला रांगोळी स्पर्धा, १२ आगस्टला हर घर तिरंगा सम्मान दिंडी काढण्यात आली. अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

त्याचप्रमाणे स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी डंबेल्स कवायत सादरीकरण, एकल व समूह गीत गायन व नृत्य, मनोरा कवायत, लेझीम कवायत होणार आहेत.